# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

मानवविद्या शाखेअंतर्गत इतिहास विषयातील पीएच. डी. पदवीसाठी
करावयाच्या संशोधनाची रुपरेषा

**संशोधनाचा विषय**

## कै .के. ना. देशमुख यांचे जीवन व कार्यः एक चिकित्सक अभ्यास

**-: संशोधक :-**

श्री प्रकाश नागनाथ वारे

वै. धुंडामहाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर

**-: मार्गदर्शक :-**

प्रा. डॉ. बालाजी एस चिरडे

पीपल्स महाविद्यालय नांदेड

**सन २०२१-२२**

# कर्मयोगी कै .के. ना. देशमुख यांचे जीवन व कार्य: एक चिकित्सक अभ्यास

**प्रस्तावना:**

कोणत्याही देशाचा असो की एखाद्या भौगोलिक परिसराचा विकास असो हा त्या परिसरातील आदर्श व्यक्तिमत्त्वामुळेच शक्य होते जर कोणत्याही परिसराला दूरदृष्टी असणारा, सामाजिक जाणीव असणारा, अभ्यासू,सेवाभावी, कृतिशील व्यक्तिमत्व लाभले तर त्या परिसराचा विकास तर होतोच व त्या परिसराला त्या व्यक्तीच्या कार्यामुळे ओळखले जाते. महाराष्ट्रातील मराठवाडा हा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असला तरी शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या काहीसा मागासलेलाच होता मराठवाड्याची ही उणीव भरून काढण्यासाठी अनेक व्यक्तीने आपले संपूर्ण आयुष्य वाहिले त्यात प्रामुख्याने श्री .स्वामी रामानंद तीर्थ, हुतात्मा गोविंद पानसरे, भाऊराव भिमाजी पाटील मतसागर, इत्यादींचा उल्लेख करता येईल

याचप्रमाणे महाराष्ट्र तेलंगाना व कर्नाटकाच्या सीमावर्ती नांदेड जिल्ह्यातील सगरोळी येथील कर्मयोगी कै. के.ना. देशमुख यांनी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी अनेक रचनात्मक उपक्रम घेऊन समाजासमोर एक आदर्श प्रस्थापित केला आपल्या परिसरातील मागासलेपणाचे मूळ निरक्षरता व अज्ञानात आहे ही गोष्ट ओळखून त्यांनी समाजातील सर्व स्तरापर्यंत शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी संस्कृती संवर्धन मंडळ

या संस्थेअंतर्गत पाचवी ते आठवी चे वर्ग सुरू केले त्याचे उद्‌घाटन हैदराबाद मुक्तिसंग्रामातील आदर्श व्यक्तिमत्व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या हस्ते 15 जून 1960 ला करण्यात आले .कर्मयोगी कै. के. ना. देशमुखांनी संस्कृती संवर्धन मंडळाच्या माध्यमातून श्री छत्रपती शिवाजी जुनिअर बेसिक स्कूल ची सुद्धा स्थापना केली या ज्ञानदानाच्या कार्यावरच न थांबता परिसरात सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी अनेक अभिनव उपक्रम राबविले त्यांचे संस्कृती संवर्धन मंडळ ही संस्था महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्थेच्या दृष्टीने दीपस्तंभाप्रमाणे आदर्शवत ठरत आहे. त्यांनी स्थापन केलेल्या या संस्थेची व्याप्ती उत्तरोत्तर वाढतच आहे यातच शिक्षणासोबत खेळाडू वृत्तीला चालना मिळावी तसेच ज्या देशात आपण जन्मलो त्या देशाचे आपण काही देणे लागतो ही देशप्रेमाची व देशाभिमानाची जाणीव आजच्या तरुणाईत निर्माण व्हावी म्हणून कर्मयोगी कै. के .ना. देशमुख यांनी राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिक विद्यालयाची स्थापना केली. संस्कृत भाषेचे महत्त्व लक्षात घेऊन श्री वेदव्यास संस्कृत माध्यमिक विद्यालयाची स्थापना इ.स. 1996 ला करण्यात आली.

शैक्षणिक कार्यासोबतच सामाजिक कार्याची कास धरून परिसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची निर्मिती करून गरीब मुलांच्या शिक्षणाला चालना दिली तसेच विकासाला चालना देण्यासाठी राजकारणात प्रवेश केला व स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेल्या प्रथम ग्रामपंचायत मध्ये सर्व गावकऱ्यांच्या इच्छेनुसार सगरोळी ग्रामपंचायतीचे बिनविरोध पहिले सरपंच होण्याचा मान मिळविला व सलग २५ वर्ष सगरोळी चे सरपंच म्हणून काम

पाहिले यातून ग्राम विकासासाठी नवनवीन योजना आणून सगरोळी चा विकास मोठ्या प्रमाणात केला.सगरोळी परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून परिसराचे सुशोभीकरण करण्याचे बहुमोल असे कार्य माननीय कै. के. ना. देशमुख यांच्याकडून झाले.बेघरांना घर, निजाम कालीन तलावाची पुनर्वसन ,असे विविध समाज उपयोगी कार्य यांच्या मार्फत सगरोळी परिसरात करण्यात आले.

कृषी व पर्यावरण विषयक घटकांना चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य कर्मयोगी कै. के .ना. देशमुख यांनी केलेले आपणास दिसून येते सगरोळी परिसरात शेतकऱ्यासाठी सेंद्रिय शेतीची कार्यशाळा घेतली तसेच मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी ग्रामस्थांच्या सहभागातून रस्ता बनविण्यात आला. गावात सर्वप्रथम नळ योजना तसेच सार्वजनिक वाचनालय, दुष्काळी परिस्थितीत गोरगरिबांना अन्नधान्य वाटप,असे असंख्य व अनगिनत कार्य कर्मयोगी कै. के. ना.देशमुख यांनी केलेले आपणास पाहता येतील

अशा या विकास पुरुषाचा आदर्श समाजासमोर प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने त्यांचे चरित्र,कार्य व दूरदृष्टी यावर संशोधन होऊन ते लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे .

**संशोधन विषयाचे महत्त्व:**

कर्मयोगी कै. के.ना.देशमुख यांची दूरदृष्टी,जिद्द, चिकाटी च्या माध्यमातून सगरोळी सारख्या ग्रामीण भागात संस्कृती संवर्धन मंडळ या संस्थेच्या माध्यमातून विविध शैक्षणिक कार्यांना चालना दिली यात बालसदनाची निर्मीती, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेची स्थापना ,या मार्फत ग्रामीण भागातील गरीब विध्यार्थांना उत्तम शिक्षणाची सुविधा

निर्माण केली तसेच सैनिकी शाळेच्या माध्यमातून बौद्धिकते सोबतच शारीरिक व सांस्कृतिक उन्नतीच्या हेतूने शिक्षणाचा प्रसार केला.तसेच विविध सामाजिक कार्यातून सगरोळी परिसराचा विकास केला यात प्रामुख्याने अनाथ मुलांचे संगोपन, जातीभेद निर्मूलन ,बाल सदन तसेच परिसरातील गोरगरीब मुले शिक्षणा पासून वंचित राहू नयेत म्हणून गरीब विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहाची सुविधा निर्माण केली. कृषी व पर्यावरण विषयक प्रकल्पांना चालना देऊन सगरोळी परिसरातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती करावयास प्रेरणा दिली वरील सर्व कार्याचा आढावा माझ्या संशोधनात घेतला जाणार आहे त्यामुळे हे संशोधन ग्रामीण भागातील तरुणांना किंबहुना सर्व तरुण जे शिक्षणघेण्यासाठी व उपजीविकेसाठी आज शहराकडे धाव घेत आहेत त्यांना ग्रामीण विकासासाठी प्रेरणादायी व महत्त्वाचे ठरेल तसेच ग्रामीण भागात समाज उपयोगी कार्याची प्रेरणा मिळण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे ठरेल.

**समस्या सूत्रण:**

संस्कृती संवर्धन मंडळ या संस्थेच्या कार्यातून किती प्रमाणात सगरोळी परिसराचा विकास झाला? यात शैक्षणिक विकास किती? सामाजिक विकास किती? तसेच सैनिकी शाळेच्या माध्यमातून सगरोळी परिसरातील किती नव तरुणांनी प्रत्यक्ष देशसेवेसाठी लष्करात सहभाग नोंदविला? तसेच कै. के. ना. देशमुख यांच्या सामाजिक, शैक्षणिक, कृषी व पर्यावरण विषयक कार्याचा सगरोळी परिसरात किती परिणाम दिसून येतो? या विविध प्रश्नांची उकल करण्याच्या  दृष्टिकोनातून ही समस्या निर्माण होते व या समस्येची

सोडवणूक करण्याच्या दृष्टीने कर्मयोगी कै. के .ना . देशमुख यांचे शैक्षणिक, सामाजिक, कृषी व पर्यावरण विषयक कार्य हा विषय निवडला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१.सगरोळी परिसराचा व देशमुख घराण्याच्या इतिहासाचा थोडक्यात आढावा घेणे.

२ .कर्मयोगी कै. के. ना.देशमुख यांच्या जीवन चरित्राचा विषयी माहिती  घेणे.

३. संस्कृती संवर्धन मंडळ या संस्थेची स्थापना व विस्तार याविषयी माहिती संकलित करणे.

४. कर्मयोगी कै. के.ना. देशमुख यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकने.

५. कर्मयोगी कै. के. ना. देशमुख यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेण

६. कर्मयोगी कै. के. ना. देशमुख यांच्या कृषी व पर्यावरण विषयक कार्याचा उलगडा करणे.

७. कर्मयोगी कै. के.ना. देशमुख यांच्या कार्यातून नवतरुणात ग्रामीण भागात कार्य करण्याची प्रेरणा निर्माण करणे.

**गृहितके :**

१. सगरोळी परीसर व देशमुख घराणे यांना एक ऐतिहासिक वारसा  लाभलेला आहे.

२. कर्मयोगी कै. के. ना. देशमुख यांचे कार्य प्रेरणादायी आहे.

३. कर्मयोगी कै. के. ना. देशमुख यांचे कार्य सगरोळी परिसरातील सामाजिक विकासाला पूरक ठरले आहे.

४. कर्मयोगी कै. के. ना. देशमुख यांच्या कार्यातून सगरोळी परिसरातील शैक्षणिक विकासाला गती मिळाली.

५. संस्कृती संवर्धन मंडळ ही एक समाजोपयोगी संस्था आहे.

६. कर्मयोगी कै. के. ना. देशमुख यांच्या कार्यातून सगरोळी परिसरातील कृषी विकासाला व्यापक चालना मिळाली आहे.

७. कर्मयोगी कै. के. ना. देशमुख यांनी संस्कृती संवर्धन मंडळाच्या माध्यमातून सगरोळी परिसरात केलेली पर्यावरण जागृती मौलिक स्वरूपाची आहे.

८. जातीभेद निर्मूलनार्थ कर्मयोगी कै. के. ना. देशमुख यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे.

९. कर्मयोगी कै. के. ना. देशमुख यांच्या दूरदृष्टीतून सैनिकी शिक्षणाची सुविधा सगरोळी सारख्या ग्रामीण परिसरात उपलब्ध झाली.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

**व्याप्ती:**

मराठवाड्याची ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, भौगोलिक, सांस्कृतिक व शैक्षणिक पार्श्वभूमीच्या धावता आढावा घेऊन उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विकास

पुरुषांच्या कार्यांचा विचार प्रस्तुत शोध प्रबंध सादर केला जाणार आहे कर्मयोगी कै. के देशमुख यांची कौटुंबिक पार्श्वभूमी त्यांची जडणघडण त्यांच्या दूरदृष्टिकोन आणि त्यांचे विविध क्षेत्रातील योगदान या बाबींचा विस्ताराने विचार केला जाणार आहे.

कै. के. ना. देशमुख यांच्या शैक्षणिक सामाजिक कृषी व पर्यावरण विषयक कार्य खूप मोठ्या प्रमाणात आहे या संशोधन कार्यात कै. के. ना. देशमुख यांनी नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात व सगरोळी परिसरात केलेल्या शैक्षणिक, सामाजिक तसेच कृषी व पर्यावरण विषयक कार्याचा सविस्तर असा आढावा घेण्यात येणार आहे.

**मर्यादा:**

हे संशोधन केवळ सगरोळी परिसर व कर्मयोगी के. ना. देशमुख यांचे जीवन व कार्य हे केंद्रस्थानी ठेवून केले जाणार आहेत.

**संशोधन पद्धती व तथ्य संकलन:**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येईल यासाठी निरीक्षण, सर्वेक्षण ,मुलाखत ,प्रश्नावली, या संकलन पद्धतीचा उपयोग करून वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने तथ्याचे संकलन केले जाईल.

तथ्य संकलन हे या संशोधन अभ्यासासाठी महत्त्वाचा भाग असून तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग केला जाईल यात के. ना.

देशमुख यांची स्फूट लेखांच्या संग्रहाचा अभ्यास करने तसेच सगरोळी परिसराला प्रत्यक्ष भेट यात तेथील शैक्षणिक संस्था म्हणजेच संस्कृती संवर्धन मंडळ या संस्थे अंतर्गत येणारी श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय इत्यादी विषयी माहिती संकलित करणे, कै.के. ना. देशमुख यांच्याशी संबंधित व्यक्तीच्या मुलाखती व प्रश्नावली पद्धतीच्या माध्यमातून तथ्य संकलन करणे, याशिवाय तेथील ऐतिहासिक दस्तावेज, संस्थेची वेळोवेळी प्रकाशित होणारे विशेषांक, मासिके, व संस्थेचे अहवाल इतर मान्यवरांचे कै. के.ना. देशमुख यांच्यावर लिहिलेले लेख इत्यादी साधनाचा संशोधनात प्राथमिक व दुय्यम साधने म्हणून उपयोग करता येईल.

## प्रकरणाची वर्गवारी:

## प्रकरण पहिले:

### १.विषय प्रवेश:

संशोधन कार्याची रूपरेषा या पहिल्या प्रकरणातून प्रतिपादन करण्यात येईल .यात समस्या सूत्रण, संशोधन उद्दिष्टे, ग्रहीतके ,संशोधनाची आवश्यकता, पूर्व संशोधनाचा

आढावा, संशोधन पद्धती, विषयाची व्याप्ती ,स्वरूप व मर्यादा तसेच तथ्य संकलन पद्धती याबद्दल सविस्तर माहिती असेल.

**प्रकरण दुसरे:**

**२.सगरोळी व परिसराचा इतिहास :**

नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात असलेले सगरोळी या गावाला प्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. आज तागायत येथे असलेले चार शिलालेख हे इ .स. १११० मधील कल्याणी चा सहाव्या विक्रमादित्य  चालुक्याच्या काळातील असलेले समजते तसेच या गावाचे प्राचीन नाव सावरवल्ली असून हे गाव प्राचिन काळी 24 गावांच्या समूहाचे मुख्यालय होते. उत्खननात मिळालेले सर्वेश्वर मंदिर व अप्रतिम शिल्पाचे अवशेष या ऐतिहासिक वारशाची नोंद या प्रकरणातून घेतली जाईल.

**प्रकरण तिसरे:**

**३. कर्मयोगी  कै. के. ना. देशमुख यांचे जीवन परिचय :**

या प्रकरणात कर्मयोगी के .ना .देशमुख यांचा जन्म,बालपण, संस्कार, शिक्षण, वैवाहिक जीवन, व अशा सर्व तात्कालीन घटकांचा सविस्तर वृत्तान्त यासंदर्भात विवेचन व स्पष्टीकरण केले जाईल.

## ४. प्रकरण चौथे:

## कर्मयोगी के.ना. देशमुख यांचे शैक्षणिक कार्य :

‘सा विद्या या विमुक्तये ‘ या संस्थेच्या ब्रीद वाक्या नुसार सगरोळी परिसरातील जनसामान्यांच्या बौद्धिक ,शारीरिक, औद्योगिक व सांस्कृतिक विकास हा शिक्षणातून साध्य करता येतो हे लक्षात घेऊन संस्कृती संवर्धन मंडळ या संस्थेची स्थापना करण्यात आली व या संस्थेद्वारे माध्यमिक, उच्च माध्यमिक तसेच सैनिकी शिक्षणाची सुरुवात करण्यात आली याविषयीचा सविस्तर आढावा या प्रकरणातून घेण्यात येणार आहे.

## प्रकरण पाचवे:

## ५. कर्मयोगी के.ना. देशमुख यांचे सामाजिक कार्य :

या प्रकरणात कर्मयोगी के.ना. देशमुख यांच्या सामाजिक कार्याचा सविस्तर आढावा घेतला जाईल यात त्यांनी केलेले सामाजिक कार्य म्हणजेच १.बेघरांना घर बांधून देणे २.जातिभेद व अस्पृश्यता निर्मूलन करणे ३.माणिक प्रभू मठाची स्थापना ४.दुष्काळ काळात गरिबांना अन्नधान्याचे वाटप ५.अनाथ मुलांचे संगोपन ६.गरीब विद्यार्थ्यांसाठी

वसतिगृहाची सुविधा ७.संजीवनी आरोग्य मंदिराची स्थापना इत्यादी विषयीची सविस्तर माहिती या प्रकरणातून घेतली जाईल.

**प्रकरण सहावे:**

**६.कर्मयोगी के. ना. देशमुखांचे कृषी व पर्यावरण विषयक कार्य:**

कर्मयोगी के. ना. देशमुख यांचे कृषी व पर्यावरण विषयक कार्याची सविस्तर व तपशीलवार नोंद या प्रकरणातून घेतली जाईल यात विशेष करून के.ना.देशमुखांनी केलेले १. वृक्ष लागवडीतून सगरोळी परिसराचे केलेले सुशोभीकरण २.सगरोळी येथील निजामकालीन तलावाची पुनर्स्थापना ३.शेतकऱ्यांसाठी सेंद्रिय शेती मेळाव्याचे आयोजन व तसेच ४.जलसंधारण प्रकल्प ई. विषयीच्या वृत्तांताची नोंद या प्रकरणात घेण्यात येईल.

**प्रकरण सातवे:**

**७. उपसंहार:**

या प्रकरणातून प्रस्तुत संशोधन अभ्यासाचा सारांश, निष्कर्ष, तसेच कर्मयोगी के .ना . देशमुख यांच्या कार्याचे मूल्यमापन व महत्त्व सांगितले जाईल.

**संदर्भ सूची:**

१. संस्कृती संवर्धन मंडळ 22 जानेवारी 2010 ' बिल्वदले' कर्मयोगी के.ना. देशमुख सगरोळीकर यांच्या स्फुट लेखांचा संग्रह.

२. गुरुनाथराव देशमुख व भालचंद्र देगलूरकर यांचे 'कर्मयोगी बाबासाहेब देशमुख'.

३. प्रमोद देशमुख -2021 - 'प्रमोदायन '

४. संस्कृती संवर्धन मंडळ शारदानगर सगरोळी फेब्रुवारी -मार्च 2002 'विद्याव्रत' के.ना. देशमुख अमृत महोत्सवी विशेषांक

५. संस्कृती संवर्धन मंडळ शारदानगर सगरोळी जानेवारी 2010 'विद्याव्रत'- सुवर्णमहोत्सवी विशेषांक

६. संस्कृती संवर्धन मंडळ शारदानगर सगरोळी फेब्रुवारी -2020 'विद्याव्रत' हीरक महोत्सवी विशेषांक.

७. कुंटे,मु.के. व कुंटे विजया, नांदेड जिल्हा दर्शन, पुणे ,मंदिर कोश प्रकाशन, 1999.

८. देगलूरकर गो ब महाराष्ट्रातील शिल्पकलेची वाटचाल संशोधन धुळे राजवाडे संशोधन मंडळ जून 1996

९. नांदेड जिल्हा गॅझेटियर -भाग 1.

१०. नांदेड जिल्हा गॅझेटियर -भाग 2.

११. कल्पना देशमुख- नांदेड जिल्ह्यातील  गढी व वाडे.

१२. राजन अमिताभ व इतर(संप) स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध ,नांदेड, नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय, 1 मे 1986.

१३. कठारे अनिल व साखरे विजया- भारतीय कलेचा इतिहास ,नांदेड, कल्पना प्रकाशन ,2008

**संशोधक**

श्री.प्रकाश नागनाथ वारे

वै.धुंडामहाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर

**मार्गदर्शक**

प्रा. डॉ. बालाजी एस .चिरडे

पीपल्स महाविद्यालय नांदेड